1

50

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** विश्राम बाग

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0044 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/01/2023 06:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Date From (दिनांक पासून):** 30/01/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 30/01/2023

**Time Period (कालावधी):**

**Time From (वेळेपासून):** 13:37 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:02 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 31/01/2023 **Time (वेळ):** 05:28 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/01/2023 05:28 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दक्,असले पार्किंगमध्ये सांगली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) Name (नाव): सतीश दिनकर पाटील

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1975

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | येडेमच्छींद्र,तावाळवा जिसांगली ,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | येडेमच्छींद्र,तावाळवा जिसांगली ,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-7517552211

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनता विठ्ठलराव भानुसे | | | 1. क्रांती नगर, विजयनगर, ,सांगली ,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र, भारत |
| 2 | दिलीप निवत्ती देसाई | | | 1. देसाई मळा, ढवळी ,तातासगाव जिसांगली,विश्राम बाग,सांगली, महाराष्ट्र,भारत |
| 3 | मोहिनी चव्हाण संशयित | | | 1. उपजिल्हाधिकारी महसुल, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली,विश्राम बाग,सांगली, |



Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम150000/ रू. (एक लाख पन्नास हजार रुपये) | 1,500,000.00 |

10 **Total value of property (in Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,500,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब दि.31.01.2023

मी सतीश दिनकर पाटील, वय 48 वर्ष, व्यवसाय :- नोकरी, रा. येडेमॉच्छद्र, ता. वाळवा, जि. सांगली. मो.नं. 7517552211.

मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासहित राहत असून, सन 2015 साली मारुती आनंदराव मानकर व इतर सात रा. येडेमॉच्छद्र, यांची मौजे लवणमाची, ता. वाळवा येथील गट नं 345 व 347 मधील एक हेक्टर 27 आर शेतजमीन खरेदी करणार असल्या बाबत नोटरी केली आहे.

मी दि. 19.01.2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली येथील पोलीस निरीक्षक, श्री दत्तात्रय पुजारी याचे समक्ष उपस्थित राहून माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. माझ्या तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्याकरीता पोलीस निरीक्षक, श्री दत्तात्रय पुजारी साहेबांनी दोन शासकीय पंच कार्यालयात उपलब्ध करुन घेतले व सदर ठिकाणी माझी व दोन्ही पंचांची एकमेकाशी ओळख करुन दिली. त्यानंतर पुजारी साहेब यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्याप्रमाणे मी तक्रार सांगीतली.

मी मारुती मानकर यांची खरेदी करणार असलेली शेतजमीन महार वतना अंतर्गत येत असल्याने मारुती मानकर यांनी सदर शेतजमीन विक्री करण्याची परवानगी मिळणेकरीता जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे दि.30.06.2015 रोजी अर्ज केला होता. सदर अर्जाचे अनुषंगाने प्रस्ताव तयार करण्याचे काम कुळवहिवाट शाखा येथील अव्वल कारकुन भानुसे पाहतात. मारुती मानकर यांनी सदर अर्जाचे संबधात लागणारे कागदपत्रांची पुर्तता करणे बाबत मला सांगीतले होते. त्याप्रमाणे मी अव्वल कारकुन भानुसे यांची स्वत: व माझे ओळखीचे क्लार्क श्री दिलीप देसाई यांचे सोबत अधुनमधुन भेट घेऊन त्यांच्याशी कामा बाबत चर्चा करीत असतो. अव्वल कारकुन भानुसे मला मानकर यांनी केलेल्या अर्जावरुन प्रस्ताव तयार करण्यात काय त्रुटी येतात व मानकर यांनी केलेल्या अर्जावरील प्रस्तावाचे काम कसे होणार नाही हे सांगत असतात.

जिल्हाधिकारी कार्यालयातील रोजगार हमी योजना विभागातील क्लार्क दिलीप देसाई व माझी ओळख आहे. क्लार्क दिलीप देसाई यांनी दि.09.01.2023 रोजी मला मोबाईलवर संपर्क करुन अव्वल कारकुन भानुसे यांनी मानकर यांनी महार वतनाची जमीन विक्री करणेस दिलेल्या अर्जावरील तयार झालेला प्रस्ताव मंजुर करण्यासाठी दोन लाख रुपये मागीतले आहेत असे सांगुन अव्वल कारकुन भानुसे यांनी भेटण्यास जिल्हाधीकारी कार्यालय सांगली येथे बोलवले असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे मी व क्लार्क दिलीप देसाई असे दोघांनी दि.10.01.2023 रोजी जिल्हाधीकारी कार्यालयाचे पार्कीगचे आवारात अव्वल कारकुन भानुसे यांची भेट घेऊन त्यांचेशी मारुती मानकर यांनी केलेल्या अर्जावरील तयार केले प्रस्तावाचे अनुषंगाने चर्चा केली. त्यावेळी अव्वल कारकुन भानुसे यांनी त्यांना



Scanned with OKEN Scanner

प्रस्ताव तयार करण्यास असलेल्या कागदपत्रांच्या अडचणी सांगुन प्रस्ताव मंजुर होणार नसल्याचे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना प्रस्तावाचे काम करून देणे बाबत विनंती केली. त्यावेळी अव्वल कारकुन भानुसे यांनी मला दोन लाख रुपये द्या, प्रस्ताव मंजुर करून देतो असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना माझी येवढी रक्कम देण्याची ऐपत नसल्याचे सांगीतले. त्यावेळी क्लार्क दिलीप देसाई यांनी मला अव्वल कारकुन भानुसे यांना दोन लाख रुपये द्या, ते तुमचे काम करून देतील, नाहीतर तुमची चार वर्षांची मेहनत वाया जाईल असे सांगुन अव्वल कारकुन भानुसे यांना दोन लाख रुपये देण्यास मला सांगीतले. अव्वल कारकुन भानुसे व क्लार्क देसाई माझ्याकडे दोन लाख रुपये लाचेची मागणी केली आहे. तरी अव्वल कारकुन भानुसे व क्लार्क देसाई यांचेवर योग्य ती कारवाई करावी असे मजकुराची हस्तलिखीत तक्रार दिली. त्यानंतर पुजारी साहेबांनी मला माझे मोटर सायकलवरून एंशी फुटी रोड विश्रामबाग सांगली येथे जाऊन थांबणेस सांगीतले. त्याप्रमाणे मी माझे मोटर सायकलवरून रवाना होऊन एंशी फुटी रोड विश्रामबाग सांगली येथे दाखल झालो.

त्यानंतर थोड्याच वेळात पुजारी साहेब, दोन पंच व सापळा पथक सदर ठिकाणी आले. त्यानंतर पुजारी साहेबांनी मला व दोन्ही पंचाना त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपूर्ण माहिती देऊन त्या व्हाइस रेकॉर्डरमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले त्यानंतर क्लार्क देसाई व अव्वल कारकुन भानुसे यांचेकडे मी दिले लाच मागणी अर्जाचे अनुषंगाने पडताळणी करण्याकरीता मला तसेच पंच श्री कोळी यांना योग्य त्या सुचना देऊन त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझ्याकडे दिला. तो मी माझ्या पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवला. त्यानंतर मला व पंच कोळी यांना क्लार्क देसाई व अव्वल कारकुन भानुसे यांची जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे जाऊन भेट घेणेकरीता रवाना होणेकरीता इशारा केला. त्याप्रमाणे मी व पंच कोळी असे माझ्याकडील हिरोहोंडा शाईन मोटारसायकल नं. एम.एच. 10 डी.एफ. 4294 वरून दुपारी 3.20 वाजणेचे सुमारास रवाना होऊन जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील रोजगार हमी योजना कार्यालयात गेलो. सदर ठिकाणी आम्ही क्लार्क देसाई यांची भेट घेतली. त्यानंतर मी, क्लार्क देसाई व पंच कोळी असे दुसऱ्या मजल्यावरील कुळवहिवाट शाखा येथे गेलो. अव्वल कारकुन भानुसे यांनी आम्हाला पाहुन ते त्यांचे बसलेल्या जागेवरून उठुन आमचे जवळ आले. आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवारात असलेल्या कॅन्टीनमध्ये चहा पिण्यासाठी गेलो. अव्वल कारकुन भानुसे यांनी क्लार्क देसाई यांचेकडे हाताने इशारा करून निरोप दिला आहे यांना असे सांगुन माझेशी कामा बाबत चर्चा केली. त्यावेळी अव्वल कारकुन भानुसे यांना जास्त होतय साहेब, मुद्रांक शुल्क पण दोन लाख एकवीस हजार रुपये भरण्याचे असल्याचे सांगुन कमी करण्याबाबत विनंती केली. त्यावर अव्वल कारकुन भानुसे यांनी मला "तुम्ही सांगा मी सांगतो, मॅडमना, तुम्ही सांगा" असे सांगीतले. त्यावर मी अव्वल कारकुन भानुसे यांना नाव ठेवण्या बाबत विनंती केली. अव्वल कारकुन भानुसे यांनी मला "तुम्ही सांगा ना, तुम्ही सांगीतलं पाहिजे. काय असेल तर काय? अडचण नाही कागदावर लिहुन सांगा, मोबाईलवर टाईप करून सांगा" असे सांगीतले. त्यावर क्लार्क देसाई यांनी मला "साहेबांनशी बोला काय असले ते बोला, एवढ एवढ करू शकतोय" असे सांगीतले. त्यावर अव्वल कारकुन भानुसे यांनी मला "तुमचा निरोप देणार मी मॅडमना तुमचा आकडा फक्त सांगा, दोन देतो, चार देतो, पाच देतो, तुम्ही सांगना झालाय तर" असे सांगीतले. त्यावर क्लार्क देसाई यांनी चर्चा करून सांगा असे मला सांगीतले. त्यावर मी त्यांना मालकर यांचेशी चर्चा करून सांगतो असे सांगीतले. त्यावर अव्वल कारकुन भानुसे यांनी मला आज सांगा उद्या सांगा असे सांगीतलेने मी येतो असे सांगुन मी व पंच कोळी असे एंशी फुटी रोड विश्रामबाग सांगली येथे पुजारी साहेबांचे समक्ष हजर झालो. तेथे पुजारी साहेबांनी मला व पंच कोळी यांना हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमधे झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली.

अव्वल कारकुन भानुसे यांनी मला चर्चा करून सांगा असे सांगीतल्याने दि.20.01.2023 रोजी मी व पंच कोळी असे अव्वल कारकुन भानुसे यांना भेटण्याकरीता माझे बँकेतील खातेदार दिलीप भिमराव पाटील यांनी आणलेली माझी हिरोहोंडा शाईन मोटारसायकल नं. एम.एच. 10 डी.एफ. 4294 वरून रवाना होऊन जिल्हाधिकारी कार्यालयातील कुळवहिवाट शाखा येथे गेलो. अव्वल कारकुन भानुसे हे जत येथे तपासणीकरीता गेले असल्याचे समजल्याने परत येऊन मी व पंच कोळी असे पुजारी साहेबांचे समक्ष हजर झालो.

त्यानंतर पुजारी साहेबांनी दिले सुचने प्रमाणे मी माझे मोबाईल नंबर 7517552211 वरून अव्वल कारकुन भानुसे यांचे मोबाईल क्र 7028975249 वर कॉल करून मोबाईलचा स्पिकर फोन ऑन केला परंतु भानुसे साहेबांनी माझा कॉल रिसीव्ह केला नाही. त्यानंतर पुन्हा मी भानुसे साहेबांना कॉल केला परंतु त्यांनी माझा कॉल रिसीव्ह केला नाही.

दरम्यान मुदतीत भानुसे साहेबांनी मला 04.25 वाजण्याचे सुमारास कॉल करून "अजुन एक अर्धा पाऊन तास जाईल, जतला आलतो" असे सांगीतले, त्यावर मी त्यांना "रविवारी येऊ का भेटायला" असे सांगीतले असता, त्यांनी "नको फोन करतो" असे सांगीतले, त्यावर मी त्यांना "ठिक आहे साहेब" असे म्हणुन कॉल कट केला.



Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन ऑफिसर,

**Signature of Officer In charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): KALLAPPA SATU PUJ

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI



Scanned with OKEN Scanner